म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

निबंध

म. ग्रं. सं. ठाणे
निबंध
नं. २२
सन-१८९४

श्री दत्तात्रय प्रसन्न.

# ऋणविमोचन.

हें पुस्तक

बेळगांव येथें

"धुंडिराज" छा० छा०

सन १८९४

किंमत ३ आणे.

श्रीदत्तात्रयप्रसन्न.

# ऋणविमोचन.

हें पुस्तक

[redacted] विश्वनाथ टोकेकर

यांनीं रचिलें

तें

[redacted] गोविंद सडेकर

यांनीं

[redacted] 'धुंडिराज' छा० छा०

सन १८९४

( या पुस्तका संबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्याने स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ३ आणे.

[illegible]
[illegible] मिळकंठ [illegible]
[illegible] स्मरणार्थ,
[illegible] ग्रंथालय [illegible]
[illegible]

---

# पुस्तकार्पण.

हें पुस्तक

माझे परमप्रिय मित्र,

रा. रा. दत्तात्रय गोविंद सडेकर;

'लोकामित्र' मासिक पुस्तकाचे म्यानेजर, यांस

त्यांच्या मित्रप्रेम या गुणांस

लुब्ध होऊन

त्यांची परवानगी घेऊन

परमादरानें

अर्पण केलें आहे.

"मा. वी. टोकेकर."

पुस्तक कर्ता.

# प्रस्तावना.

आर्यबांधवांच्या प्रस्तुतच्या निकृष्ट स्थितीचा मूळ उत्पादक शत्रू जो 'कर्ज' त्यामुळें मनुष्यांवर येणारीं अनेक संकटें, त्यापासून होणारे नफे व तोटे, यांचें चित्र त्यांजपुढें ठेवून त्यांना वेळींच सावध करण्याचें धाडस कर्त्यानें या पुस्तकांत केलें आहे, व यास 'ऋणविमोचन' हें नांव देऊन स्वदेशबांधवांच्या सेवेंत सादर केलें आहे.

क्रमाक्रमानें, आर्यांस गांजित असलेल्या उत्पादक शत्रूंचीं चित्रें पुस्तकरूपानें विबुधजनांच्या सेवेस सादर करण्याचा कर्त्याचा दृढ मानस आहे, पण तो केवळ प्रिय देशबांधवांच्या उदाराश्रयावर अवलंबून आहे.

रसज्ञ वाचक यांतील दोषांकडे विशेष करडी नजर न करितां 'हंसक्षीर' या न्यायानें गुणांचेंच तेवढें ग्रहण करितील व कर्त्यास स्वदेशसेवा करण्या विषयींचें उत्तेजन, असेंच निरंतर आणून देतील अशी महदाशा आहे.

सदर्हू पुस्तकाचे कामीं आमचे मित्र रा. रा. गोपाळ विष्णु रास्ते यांनीं ज्या ज्या उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

दुसरें, माझे परमप्रिय मित्र रा. रा. दत्तात्रय गो-

विंद सडेकर, यांनीं केवळ मित्रभावानें हें व माझीं इतर पुस्तकें छापवून देण्याच्या कामीं जी मदत केली व करीत आहेत, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत.

हें पुस्तक तयार करितानां आह्मांला—

Debt and how to get out of.

या नांवाच्या इंग्रजी पुस्तकाचा बराच उपयोग झाला.

बडनेर.<br>
ता. १९ मे १८९४

मा. वि. टोकेकर.<br>
पुस्तक कर्ता.

श्रीदत्तप्रसन्न.

# ऋणविमोचन

## किंवा

# कर्जमुक्तहोण्याची युक्ती.

फार प्राचीन कालापासून, आपल्या या हिंदुस्थान देशाची संपत्तिविषयीं जिकडे तिकडे प्रख्याती असल्यामुळें, या देशाला पर राष्ट्रांपासून आजपर्यंत पुष्कळ त्रास व हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. हल्लीं जी आपण स्थिति भोगीत आहोंत, त्याचें कारणही पुष्कळ अंशीं वरील होय. आपल्यांतील एक कवि राष्ट्रविषयीं लिहितो कीं, "शुका ऐशा योगें सतत पिंजऱ्या माजि पडशी ॥ परी स्वातंत्र्याचीं अनुपम सुखें सर्व मुकशी ॥" हें राष्ट्रविषयींचें वरील कवीचें ह्मणणें आमच्या देशाच्या स्थितीस सर्वथैव लागू पडतें. आह्मांस जी दारिद्र्यावस्था येत चालली आहे, त्याचें मुख्य कारण कर्ज हें होय. कर्जें दोन प्रकारचीं आहेत. एक राष्ट्रीय व दुसरें व्यक्तीचें. सर्व माणसांना आपल्या कुटुंबासह सुखी राहण्याची इच्छा असते, आणि असें वाटणें हें साहजिक आहे. आपल्या प्र-

पंचाचा कारभार जर आपण व्यवस्थेनें व दूरदृष्टीनें चालविला तर हजार हिशानें सुख मिळण्याचा संभव आहे; परंतु आमच्या देशांतील लोकांची स्थिति गृह-व्यवस्थेसंबंधानें अगदीं उलट प्रकारची आहे.. पुष्कळ लोकांचें सर्व आयुष्य काळजींत जातें, आणि आपल्या मुलांबाळांच्या मागेंही ते काळजी लावून ठेवितात. ही काळजी निरनिराळ्या कारणामुळें उत्पन्न होते; परंतु मुख्य कारण पाहूं गेलें असतां कर्ज हें होय. एखादें राष्ट्र घ्या अगर कुटुंब घ्या. ज्या राष्ट्राला किंवा कुटुंबाला अतोनात कर्ज होत जातें, तें राष्ट्र किंवा तें कुटुंब ऱ्हास कालास येऊन पोहोंचतें. हिंदुस्थान देशाच्या अवाढव्य उत्पन्नाची, राष्ट्रिय कर्जामुळें कशी वाताहत होते व दिवसेंदिवस राजशकट चालविणें किती जोखमीचें होत चाललें आहे, हें सर्व सप्रमाण देणें फार कठीण आहे. तेव्हां यासंबंधानें विचार न करितां, प्रस्तुत "लोकांना कर्ज होण्याचीं कारणें व त्यास उपाय" एवढ्याच गोष्टीचा आह्मी विचार करितों.

दूरदृष्टी देऊन पुढील संकट टाळण्याचा उपाय पूर्वींच योजून ठेवणें, हा रानटी आणि सुधारलेल्या लोकांतील मोठा भेद आहे. रानटी मनुष्य सध्यस्थितीचा मात्र विचार करितो, आज तो सुग्रास अन्न खाईल व उद्यां अन्नास मोताद होईल. यासारखेच पुष्कळ लोक आपली सर्व प्राप्ती, पुढील स्थितीचा विचार न करितां खर्च करून टाकितात; मग एखादें अनुभूत कार्य उत्पन्न झालें असतां, किंवा घरांतील कर्ता मनुष्य

स्वा. गो
११४



आजारी पडला तर कर्जाशिवाय तरणोपाय नाहीं अशी स्थिति होते. दूरदृष्टी आणि शहाणा मनुष्य आपल्या प्राप्तीपैकीं योग्य भाग नेहमीं राखून ठेवितो, आणि प्रसंगीं त्याचा उपयोग करितो, व अशा रीतीनें व्याजाच्या फेऱ्यांत येण्याचा प्रसंग त्याला पडत नाहीं. आतां कर्ज, त्याचीं कारणें, त्यापासून होणारे वाईट परिणाम व त्यांतून आपली सुटका कशी करून घ्यावी, ह्याविषयीं दोन शब्द लिहितों.

---

## कर्जाचीं कारणें.

फार प्राचीन काळापासून हिंदुस्थान देशांत कर्ज करण्याची चाल आहे. ऋग्वेदामध्यें कर्जमुक्त होण्याबद्दल वरुणाची प्रार्थना केली आहे. हल्लीं देखील या देशांत कर्ज काढण्याची संवय, सुशिक्षित आणि अशिक्षित लोकांत बहुतेक सारख्या प्रमाणानें आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. कर्जबाजारी आणि सावकार असे लोकांचे साधारणपणें दोन भाग करितां येतील. एखाद्या कुटुंबांतील कर्ता, ज्यावर कुटुंबांतील सर्व माणसें अवलंबून असतात, असा जर अकालीं मरण पावला, तर कर्ज होण्याचा संभव असतो; अथवा अतिशय दुष्काळ पडला तर साधारणप्रतीच्या मनुष्यास कर्ज काढणें भाग पडतें. जगांतील कोणतेंही राष्ट्र घ्या. त्यांतील कर्जाचीं मुख्य कारणें पाहूं गेलें असतां, आय्या बाहेर खर्च करणें; आपल्याला पुढें अ-

मुक एक रक्कम मिळणार आहे या भिस्तीवर पूर्वीच वाटेल तसा खर्च करणें, जुवा खेळणें, व आळस हींच आहेत असें दिसून येईल. या आपल्या हिंदुस्थानदेशांत मात्र कांहीं मूर्खपणाच्या रितीभातीमुळें कर्ज होतें. त्यांतील मुख्य मुख्य कारणांचा विचार करूं.—

१ **लग्न मुंजी व और्ध्वदेहिक विधी संबंधानें होणारा फाजील खर्च**— आमच्या लोकांच्या शास्त्रांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां, वरील धार्मिक कृत्यांस फार नियमित खर्च लागतो; परंतु आमचे लोक पूर्वीच्या भरभराटींतील दिवस आठवून पुढचा मागचा विचार न करितां मूर्खपणानें व्यर्थ खर्च करितात; आणि आपले जिवास विनाकारण कर्जाची तात लावून घेतात. स्वभावतः आमचे लोक नेमस्तपणानें वागणारे आहेत, पण कांहीं कांहीं प्रसंगीं ते पाण्यासारखा पैसा खर्च करितात. अशा खर्च करणारांमध्यें इनामदार व नष्ट झालेल्या स्वराज्यांतील मोडके तोडके सरदार यांचीच गणना विशेष आहे. हे लोक आपल्या वाडवडिलांच्या वैभवाकडे लक्ष देऊन, आपली हल्लीं स्थिति काय आहे याचा कांहीं एक विचार न करितां, लग्नकार्यांत वाटेल तसा उधळपट्टीचा खर्च करितात. आपल्या देशांत दायविभागाची रीत असल्या कारणानें जाहागिरी आणि इनामें यांच्या वांटण्या होऊन, शेंकडों विभाग झालेले आहेत; यामुळें या वर्गांतील लोकांना दिवसेंदिवस वाईट स्थिति येत चालली आहे, पण विशेषतः ऋण काढून सण करण्याची तर यांना

संवयच पडून गेली आहे; यामुळें 'इनामदार तितकें कर्जबाजारी' अशी एक लोकांत साधारण ह्मण पडून गेली आहे.

आमच्या देशांतील शेतकरी वगैरे लोकांना जी दरिद्रावस्था प्राप्त होत चालली आहे, त्याचें कारण सरकार आहे, असें वारंवार ह्मणण्यांत येतें; परंतु बऱ्याच अंशानें या लोकांचें स्वतःचें वर्तनच त्यांची अशी स्थिति होण्यास कारणीभूत झालें आहे. या लोकांची पत थोडी असल्या कारणानें, लग्नकार्यासाठीं, प्रसंगीं रुपयास दरमहा २ आणे प्रमाणें व्याज देऊनही कर्ज काढण्यास तयार होतात; आणि अशा रीतीनें त्यांच्या श्रमाचें बहुतेक उत्पन्न कर्जाच्या फेडींत घालावें लागतें, तरी देखील मारवाड्यांच्या दामदुपटीमुळें यांचें डोकें क्वचितच वर निघतें.

साधारण प्रतीचे शेतकरी, ज्यांच्या जवळ कांहीं स्थावर जंगम मिळकत आहे ते लोक गहाणावर कर्ज काढितात. या गहाणांत दागदागिने, शेतीचे बैल, आउतें, व मालकीचा जमिनजुमला यांचा देखील समावेश होतो, आणि सरते शेवटीं वेळेवर गहाण मिळकतीचा विकरा करून पैसे न दिले तर सावकाराचे बंदे गुलाम होण्याचा प्रसंग येतो.

या गोष्टींचें प्रत्यक्ष प्रमाण पहाणें झाल्यास दक्षिणेंतील शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याच्या कायद्याचा इतिहास लक्षपूर्वक वांचला असतां सहज समजून येईल. या आमच्या लग्नखर्चाच्या असह्य बाबीमुळें

पुष्कळ कुलिन कुटुंबांना, मुलींच्या लग्नाचें मोठें ओझें पडतें. रजपूत लोकांत या लग्नखर्चाच्या घातक चालीमुळें बिचाऱ्या निरुपद्रवी मुलींचे बळी पडल्याचें ऐकूं येतें.

२ **पैशाचा उपयोग फायद्याच्या कामांत न करितां, दागदागिन्यांत आडवून टाकणें**– कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, हिंदुस्थान देशाला दारिद्र्य येण्याला कारण हिंदूलोक आपला पैसा दागदागिन्यांत खर्च करितात हें नव्हें, तर राजकीयखर्चामुळें या देशाचा पैसा परदेशीं जातो हें होय, हिंदुस्थानांत गेल्या तीस पस्तीस वर्षांत, परदेशांतून सोनें रुपें किती आलें व बाहेरदेशीं किती गेलें, याचे जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून उघड दिसतें कीं, जगामध्यें उत्पन्न होणाऱ्या सोन्याचा एक चतुर्थांश व रुप्याचा एक तृतीयांश या देशांत येतो. सन १८०१ सालापासून आपल्या देशांत सुमारें ४९० कोटी रुपयांचें सोनें रुपें आलें. या सोन्या रुप्यांतील निम्याहून अधिक सोनेंरुपें लोकांनीं दागदागिन्यांत अडवून टाकिलें आहे; व त्यापासून देशास व्यापाराच्या दृष्टीनें मुळींच फायदा होत नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सोन्यारुप्याचे दागिने घडविणाऱ्यांची संख्या सुमारें चार लाख आहे. यांतील प्रत्येक सोनाराचें महिन्याचें उत्पन्न, स्थूलमानानें दरमहा रुपये सहा जरी धरिले तरी दरसाल निवळ दागिने करण्याकडे २ कोट ८८ लक्ष रुपये विनाकारण खर्च होतात. दा-

गिन्यांपासून उत्पन्न तर होत नाहींच हें वर दर्शविलेंच आहे, पण दागिने वापरल्यामुळें झिजून त्यांची किंमत मात्र उतरते. चोऱ्या, खून, वगैरे गोष्टी नेहमीं ऐकूं येतात, व दरवर्षी शेंकडों मुलाबाळांचे व बायकांचे या दागिन्यांच्या पायीं बळी पडतात. दागिन्यांत पैसा खर्च न करितां जर त्याचा उपयोग व्यापारांत केला तर त्यापासून देशाचें आणि स्वतःचें कल्याण आहे.

आपल्या देशांतील कोट्यावधी रुपये, परकी व्यापारी लोक आपल्या देशांत फायद्याच्या रूपानें दरसाल नेतात. देशांत भांडवल नाहीं अशी नेहमीं ओरड ऐकूं येते, परंतु हें कारण बऱ्याच अंशीं योग्य नाहीं. निरनिराळे व्यापारधंदे देशांत काढून, त्याचा फायदा आपल्याच देशांत राहूं देणें हें किती अवश्यक आहे हें प्रत्येक सुजाण मनुष्यास माहित आहेच, तेव्हां त्याची पुनरुक्ती करण्याची जरूर नाहीं. ज्या गृहस्थांना व्यापारांत पैसे घालण्याचें धैर्य नाहीं, अशा लोकांकरितां दयाळू सरकारानें 'सेव्हिंग बँक्स्' काढल्या आहेत. हे लोक आपला पैसा दागिन्यांत न घालतां जर सरकारच्या पेढीवर ठेवितील तर त्यापासून त्यांचे दोन मोठे फायदे होणार आहेत. एक तर, पैसा व्याजीं लागून फायदा होईल; शिवाय प्रसंगीं वाटेल तेव्हां पैसा काढून आपला उपयोग करून घेतां येईल. दागिन्यांत पैसे घालणारा या दोन्हीही फायद्यांस आंचवतो. सुमारें दोनशें कोटी रुपये दागिन्यांत अथवा दुसऱ्या अशा निरुपयोगी कामांत अडकून

गेलेले आहेत, असा अदमास आहे. सदर्हू रकमेचें दरसाल दरशेंकडा सहा रुपये जरी व्याज आलें तरी बारा कोटी रुपये उत्पन्न होतील; ह्मणजे या देशाच्या जमीन महसुलाच्या निम्में उत्पन्न होईल. अशा रीतीनें पुरून ठेविलेल्या अगर दागिन्यांत आडविलेल्या पैशा-चा उपयोग, शेतकी सुधारण्याकडे अगर दुसऱ्या ए-खाद्या फायदेशीर कामाकडे, जर लोक उपयोग करि-तील, तर हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितींत मोठ्या मह-त्वाचा फेरफार होईल.

---

## कर्जाचा परिणाम.

कर्ज काढल्या पासून मनुष्यास सुख प्राप्त झालें आहे, असें क्वचित् होतें; तेव्हां कर्जापासून होणाऱ्या घातक परिणामांचा संक्षेपानें विचार करूं.

१ **पैशाचें नुकसान**—पैशाची देवघेव करणारे सावकार सुमारें दोन लाखांवर आहेत; शिवाय खास-गी रीतीनें देवघेव करणाऱ्या सावकारांची संख्याही मोठी आहे. या सावकार लोकांच्या वर्गांत तीनशें-च्या मारवाडी लोकांचा तर विशेष भरणा आहे. ए-खाद्या कुळास पैसा देतांना हे मारवाडी लोक पाऊणशें रुपये हातांत देऊन शंभर रुपयांचा दस्तैवज लिहून घे-तात. त्यास व्याज कमितकमी दरसाल दरशेंकडा २५ रुपये हें असावयाचेंच. शिवाय रजिष्टर फी, स्टांपाचा खर्च आणखी कांहीं किरकोळ बाबी गरीब विचाऱ्या

कुळांच्या बोकांडीं बसवितात. एतावता इतका खटा-टोप करून, कुळांच्या पदरीं शंभराचे सत्तर रुपये प-डले ह्मणजे मोठेंच भाग्य समजावयाचें. अशा रीतीनें ठरलेल्या व्याजा प्रमाणें चार वर्षांचें व्याज शंभर रुपये होऊन मूळ मुद्दल कायम असतें. ह्मणजे शंभररुपये विनाकारण बिचाऱ्याचे व्याजा पायीं बुडतात.

जर मनुष्या जवळ पैसा नसेल तर त्याला कोण-त्याही फायदेशीर व्यापारधंद्यांत शिरतां येत नाहीं; जवळ पैसा नसल्या कारणानें एखादी जरुरीची जि-न्नस विकत आणावयाची असल्यास उधार आणावी लागते. आपल्यांत ह्मण आहे कीं, "उधारीचें पोतें आणि सवा हात रितें" अशी बिचाऱ्याची स्थिति होते. दुकानदार जो माल देईल व जो आकार लावी-ल तितका देणें भाग पडतें. अशा रीतीनें रीण काढून सण करणारास पैशाचें नुकसान सोसावें लागतें.

२ अपमान-- एखाद्या सावकाराचें जर एखा-द्या कुळास देणें असलें आणि ठरलेल्या मुदतींत जर त्याचें देणें फिटलें नाहीं, तर त्याला तोंड दाखविणें कुळाच्या मोठ्या जिवावर येतें; कारण सावकाराची आणि याची गांठ पडली तर सावकार वाटेल ते शब्द त्याला बोलतो व त्याचा हवा तसा अपमान करितो आणि या कुळाला तें सर्व निमूटपणें सोसून घ्यावें ला-गतें. इतकें होऊन सावकाराचें देणें दिलें नाहीं तर घरीं तगादेदार पाठवितो, व हें संकट टाळण्या करितां बिचाऱ्या घरच्या माणसांना, यजमान घरीं नाहीत

असा बहाणा करण्याचा प्रसंग येतो; आणि व्यर्थ खोटें बोलण्याचें पातक मात्र लागतें. ही गोष्ट येथेंच थांबत नाहीं तर, सावकार पुढें फिर्याद करितो आणि आपल्या पैशाच्या वसुलाकरितां, त्याच्या घरादाराचा व जिनगीचा लिलांव करितो. इतकेंही करून सावकाराचे पैसे आले नाहींत तर या बिचाऱ्याला शेवटीं काराग्रहवासही भोगावा लागतो. किती मरणप्राय अपमान हा त्या मनुष्याला आपण मेलों असतों तर बरें झालें असतें असें वाटावयास लागतें. जे लोक याच्या लग्नकार्यांत यानें केलेला खर्च पाहून, त्याची वाखाणणी करीत होते, तेच लोक आज याच्यावर उलटून ह्मणावयास लागतात कीं, जर याला पैसे खर्च करावयाचें सामर्थ्य नव्हतें तर एवढें रीण काढून सण करावयास कोणी सांगितलें होतें? आपल्या मूर्खपणाच्या कृत्याचें भोग आतां फळ! इत्यादि मर्मभेदक शब्दबाणांनीं त्याला ताडन करितात, आणि ह्यामुळें बिचाऱ्याला जगांत तोंड दाखविण्यासही जागा रहात नाहीं.

३ **खोटें बोलणें**— सामान्य नियम असा आहे कीं, कर्ज असणारा माणूस क्वचितच खरें बोलतो. कर्जबाजारी लोक बहुशा खर्चिक असतात. एका सावकारापासून फाजील कर्ज काढल्यानें, दुसऱ्या सावकाराकडून पैसे मिळण्याकरितां आपण कर्जमुक्त आहोंत अशी खोटी बनावणी करावी लागते, आणि ती साध्य करण्या करितां दुसऱ्या पुष्कळ खोट्या साधनांचा उपयोग करावा लागतो; तो आपल्या सावकारास ह्मण-

सं. गो-४४



तो कीं, मी आपल्या रकमेचें व्याज मुदतीच्या मुदतीस देत जाईन; आणि मुदत संपली तरी देखील हे सद्गृहस्थ कवडीही देत नाहींत. अशा रीतीनें शेंकडों वायदे होतात, पण पालथ्या घागरीवर पाणी. जणूं काय बिचाऱ्याला खोटें बोलण्याचें बाळकडूंच दिलें होतें. या गोष्टीचा अनुभव ज्याला दिवाणी कोर्टांत जाण्याचा नेहमीं प्रसंग असतो त्यालाच दिसून येतो. या कुळाच्या खोटें बोलण्याचा परिणाम काय होतो कीं, दिवाणी कोर्टें, वकील, बॅरिष्टर व कर्जेदलाल अशा लोकांना चैनीनें पोसण्या करितां हीं सावकार आणि कुळें, हक्कदारीचीं अगर वंशपरंपरे उत्पन्नेंच होऊन बसतात.

४ **सावकारांचें दास्यत्व**— सर्व मनुष्यांना स्वतंत्रता असावी, कोणी कोणाचे बंदे गुलाम असूं नये, ह्मणून सुधारलेल्या सर्व राष्ट्रांतील गुलामांना दास्यत्वांतून मोठ्या भगीरथ प्रयत्नानें मुक्त केलें; परंतु सर्व देशांत अद्यापि एक गुलामांचा वर्ग शिल्लक आहे; हे गुलाम 'गुलाम' या शब्दाच्या व्याख्ये पलिकडील आहेत. हे आपल्या मूर्खपणामुळें कोणी गुलाम न करितां, केवळ स्वतःच्या मूर्खपणाचें प्रायश्चित्त भोगण्याकरितां आपल्या धन्याचे बिनपगारी गुलाम होतात; हे धनी ह्मणजे सावकार, आणि हे गुलाम ह्मणजे कुळें हें वाचकांस निराळें सांगण्यास पाहिजे असें नाहीं. आमचे लोक आपण कोण, आपली स्थिति काय वगैरे गोष्टींचा विचार न करितां अल्प दृष्टीनें, सावकार

मांगतील त्या व्याजानें वाटेल तितकी रक्कम कर्ज काढितात. अर्थात् सावकार यांच्या मिळकती प्रमाणेंच कर्ज देत असतो, परंतु व्याज इतकें भारी असतें कीं, कुळाच्या हातून क्वचितच खातेबाकी चुकती होते. सावकाराची इच्छा कुळानें आपल्या देण्यांतून मुक्त व्हावें अशी नसतें; कारण त्याला एक तर साधेल त्या रीतीनें कुळानें गहाण लावून दिलेली मिळकत घशांत उतरविण्याची इच्छा असते; शिवाय कुळ बिचारें भित्रें असल्या कारणानें सावकाराच्या मरणीं मरत असतें. अशा तऱ्हेची नीच स्थिति अनुभवणारे लोक बहुशः शेतकरी व वतनदार असेच असतात. आपल्याला फायदेशीर अशी पिकाची किंमत लावून गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यानें उन्हातान्हांत व भरपावसांत खपून लाविलेल्या पिकांचा फायदा त्याला होऊं देत नाहींत; फार तर झालें तर त्याला व त्याच्या कुटुंबाला अर्धपोटीं पुरें इतकें अन्न देण्याची हे खुदावंत मेहेरबानी करितात. वतनदार, इनामदार व यांच्याच दर्जाचे दुसरे लोक यांची स्थिति तर फारच भयंकर. इनाम आणि वतन म्हणजे ओली हरळी असा ज्यांचा वडिलोपार्जित समज, तेव्हां अर्थातूच ही मंडळी रीण काढून सण करणारी, पोकळ मिजासी आणि आळशी अशी असते. अशा मोडक्या तोडक्या गर्भश्रीमंतांना कर्ज देण्यास सावकारमंडळी नेहमीं एका पायावर तयार असते. यांना रावसाहेब, श्रीमंत वगैरे संबोधनें देऊन, त्यांनीं कधीं लहान लहान रकमा मागितल्या असतां देतात,

दिलेल्या रकमेची दामदुप्पट झाली, व्याजाचा आणि उत्पन्नाचा मेळ बसला, ह्मणजे मग हे आपला हात आंखडून धरितात. मग सावकारांच्या घरीं यांची किंमत 'अहोची अरे होते.' कर्ज फिटून, उत्पन्न अगर इनाम परत हातीं मिळण्याची आशा नसल्यानें सावकार देईल तें मिंधे अन्न खाऊन हे त्यांचे तहाहयात बंदेगुलाम होतात. शिव शिव! कोणही लाजिरवाणी स्थिति!! ज्यांना वतनवाडी अगर इनाम वाडवडिलांकडून वारसाच्या हक्कानें मिळतें तेच गृहस्थ आपल्या मूर्खपणामुळें इनाम मिळकतीवर मोठा थोरला कर्जाचा बोजा करून आपल्या पुढील संततीस कर्जाचाच वारसा देतात.

८ अप्रामाणिकपणा— ज्यांची प्राप्ति मर्यादित आहे असे सरकारी नोकर, पेढ्यांवरील मुनीम वगैरे लोक ज्यांच्या हातांत त्यांच्या धन्याचा पैसा असतो, आणि ज्यांना वरचेवर लगेच हिशोब द्यावा लागत नाहीं, असे लोक वेळेवर आपल्या धन्याचा पैसा त्याला न कळवितां, आपल्या खासगी उपयोगाकडे खर्च करण्यास मागें पुढें पहात नाहींत. एकदां ही गोष्ट बाहेर पडली ह्मणजे ती छपविण्याकरितां खोट्या पावत्या लिहिणें, खोटा हिशोब ठेवणें, अगर प्रसंग पडल्यास फरारी होणें, अशीं अनेक अप्रामाणिकपणाचीं कृत्यें करितात; ह्मणून या मंडळींनीं फाजील खर्चाची संवय आपणास लावून घेऊं नये.

या देशांतील मोठमोठ्या तुरुंगांत पुष्कळ सुशिक्षित

लोक कैदी असतात. जे पूर्वी मोठ्या हुद्द्यावर होते, परंतु देणेदारांच्या निकडीमुळें अप्रामाणिकपणा करण्यास प्रवृत्त झाले अशा बातम्या वर्तमानपत्रांतून नेहमी ऐकूं येतात.

६ कुटुंबांतील मंडळीला भोगावा लागणारा त्रास— कर्जबाजारी माणसाला स्वतःसच दुःख भोगावें लागतें असें नाहीं तर, त्याच्या कृत्याबद्दल कुटुंबांतील माणसांना देखील त्रास भोगावा लागतो. एखादा अब्रुदार माणूस जर दिवाळखोर निघाला, तर घरादाराचें वाटोळें होऊन, ज्या त्याच्या कुटुंबांतील माणसांनीं सुख भोगिलें असतें त्यांना किती त्रास, अपमान व यातना भोगाव्या लागतात याची कल्पना, ज्यांनीं अशा स्थितींतील माणसें पाहिलीं असतील, त्यांना सहज करितां येईल. कर्जबाजारीपणामुळें धुळीस मिळालेलीं थोर थोर घराणीं या देशांत बरींच सांपडतील. ज्यांच्या घरीं हत्ती, घोडे, पालख्या व मेणे होते, ज्यांना दोन पावलें बाहेर जावयाचें म्हणजे गाडी लागत होती, त्यांच्या कर्जबाजारीपणामुळें त्यांना भरउन्हाळ्यांत छत्री मिळण्याची देखील मारामार अशी स्थिति येते ज्या वस्तु इतके दिवस जिवापाड जपून ठेविलेल्या असतात, त्याच वस्तु भरबाजारांत आपल्या समोर कवडीच्या मोलानें विकल्या जातात. अशा स्थितींत जर घरच्या कर्त्या पुरुषाला मृत्यूनें गांठलें तर त्या कुटुंबाचे जे कांहीं हाल होत असतात ते आमच्या वाचकांनीं कल्पनेनेंच जाणावे.

**७ अधर्म आणि नीतिभ्रष्टता**— जों पर्यंत मनुष्याला आपली प्राप्ति पाहून खर्च करण्याची संवय असते तोंपर्यंत त्याचा आयुष्यक्रम बराच सुरळीत व सुखावह असा चालत असतो. एकदां मनुष्य कर्ज काढून वाटेल तसा वागूं लागला ह्मणजे मग तो कोणकोणतीं व्यसनें व ढंग करील याचा नियम नाहीं.

लोकांच्या आचरणाला धर्माचें आणि नीतीचें बंधन असतें. या बंधनांतून कर्जबाजारी मनुष्य सर्वथैव मोकळा झालेला असतो. कर्जबाजारी मनुष्याला स्वर्गप्राप्ती नाहीं असें धर्मानें स्वच्छ सांगितलें आहे. आमच्या देशांतील पुष्कळ लोकांना, आपण कर्ज काढतों पण परिणाम काय होईल याचा मुळींच विचार नसतो.

---

## कर्जमुक्त कसें व्हावें.

कर्ज कसें होतें व त्याचे परिणाम काय होतात, या विषयीं दोन शब्द लिहिले. आतां कर्जमुक्त होण्यास कोणते उपाय योजावे यांविषयीं थोडेसें लिहून आटपतें घेऊं. " न करत्याचा वार शनिवार " अशी एक ह्मण आहे. अशा प्रकारच्या लोकांना आह्मीं जो उपाय ( नियम ) देणार आहोंत त्यांपासून फायदा होणार नाहीं. कारण ज्यांना कर्जमुक्त होण्याची इच्छा नसतें, त्यांच्या करितां मार्गही नाहीं. ज्यांना इच्छा आहे त्यांना मार्ग आहे; आणि अशाच लोकां करितां आह्मीं कर्जमुक्त होण्याबद्दल उपाय सांगणार आहों.

कोरडी चिंता करून कर्ज फिटावयाचें नाहीं, कांहीं तरी कृति हातून झाली पाहिजे. उंच गिरिशिखरावरून धोंडा खालीं लोटून देणें सोपें आहे, परंतु तोच धोंडा वर चढविणें अति प्रयासाचें काम आहे. हीच गोष्ट कर्जास लागू पडते. जर कर्जमुक्त होण्याची इच्छा असेल, आणि खालीं लिहिलेल्या नियमानुसार आपलें वर्तन ठेवण्याचा निश्चय असेल तर कोणी व कसाही मनुष्य असो तो कर्जमुक्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**१ तुह्मांला कर्ज किती आहे याची एक याद करा व आपलें वार्षिक उत्पन्न किती आहे हें नीट पहा**— अनिश्चित उत्पन्न जमेत धरूं नका. जर एकापेक्षां अधिक सावकार असतील तर प्रथम कोणास नंतर कोणास पैसे देणें जरूर आहे हें पाहून त्याप्रमाणें एक अनुक्रमपूर्वक याद करा.

**२ कर्जाचें व्याज व मुद्दलापैकीं कांहीं तरी भाग दरसाल अगर दरमहिना कमी होत जाईल इतकी रकम शिलक पाडतां येईल अशा रीतीनें खर्चाची व्यवस्था असावी**—ज्यांना उधळेपणानें नेहमीं खर्च करण्याची संवय आहे, अशा लोकांना वरील नियमाप्रमाणें वागणें जड जाईल; परंतु तसें वागल्या शिवाय अन्य उपाय नाहीं. ज्यांना सरते शेवटीं काटकसरीनें रहाणें भाग पडेल, ह्मणून योग्य वेळीं जर ते आपला खर्च आटोक्यांत आणून त्यांप्रमाणें वागतील तर त्यांचा कमजास्त फायदा होण्याचा संभव आहे. नुसती व्याजाची फड केल्यानें काम होत नाहीं; कारण मु-

द्दलाची रक्कम तशीच देणें राहते. कधीं कधीं असें होतें कीं, मुद्दलाच्या चौपट रक्कम व्याजाच्या रूपानें आपण सावकारास देतों, मुद्दलापैकीं एक कवडी देखील कमी होत नाहीं; याचें कारण आपण व्याज मात्र वेळेवर देत गेलों परंतु मुद्दला पैकीं कांहीं दिलें नाहीं; ह्मणून जर आपण व्याज व मुद्दल यांची थोडथोडी फेड करीत गेलों तर लौकरच व्याजासह मुद्दलाची रक्कम कमी कमी होत जाऊन आपलें सर्व कर्ज फिटेल.

समजा कीं एका मनुष्याची महिन्याची प्राप्ति दरमहा तीस रुपये आहे, आणि त्यानें दरमहा दरशेंकडा एक रुपया व्याजानें दोनशें रुपये कर्ज काढिलें आहे. आतां त्यानें जर दरमहा सव्विस रुपये खर्च करून चार रुपये कर्जदारास देण्याचा निश्चय केला तर किती वर्षांत त्याचें कर्ज फिटेल तें आपण पाहूं. सालीना रुपये अठ्ठेचाळीस द्यावयाचे.—

**फेडीच्या रकमा. रु. बाकी देणें.**

| | व्याज रु. | | मुद्दल रु. | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिल्या वर्षाच्या अंतीं. | २४ | .... | २४ | — | १७६ |
| दुसऱ्या ,, ,, | २१ | .... | २७ | — | १४९ |
| तिसऱ्या ,, ,, | १८ | .... | ३० | — | ११९ |
| चवथ्या ,, ,, | १४ | .... | ३४ | — | ८५ |
| पांचव्या ,, ,, | १० | .... | ३८ | — | ४७ |
| सहाव्या ,, ,, | ५ | .... | ४३ | — | ४ |

या वरील आंकड्या वरून असें दिसून येईल कीं,

दरसाल अठ्ठेचाळीस रुपये दिले ह्मणजे, दरशेंकडा १२ रुपये व्याजानें काढलेली दोनशें रुपयांची रक्कम सहा वर्षांत फिटली जाते, आणि ९२ रुपये व्याजा ऐवजीं सावकाराच्या घरांत जातात; आतां वरील सहाही वर्षीं आपण जर नुसतें व्याजच दिलें असतें तर आपली १४४ रुपयांची रक्कम जाऊन पुन्हा कर्जाची रक्कम आहे तशीच राहिली असती; यासाठीं मुद्दलाची फेड करणें अधिक महत्वाचें आहे. तितक्याच कर्जाची जर आपण दरमहा सहा रुपये प्रमाणें फेड केली असती तर चार वर्षांच्या आंत कर्जाची फेड होऊन, व्याजा ऐवजीं सुमारें अठ्ठावन्न रुपये मात्र सावकाराच्या घरांत गेले असते.

३ डागडागिने गहाण ठेवून व्याजी कर्ज काढण्याच्या ऐवजीं शक्य असेल तर त्याचा वेळींच विक्रा करावा— गहाण ठेवलेल्या वस्तु लवकर सोडविण्याचें सामर्थ्य असल तर गोष्ट निराळी. परंतु तशी आशा नसतां व्याज वाढवून घेऊन जिन्नस तसेच सावकाराच्या पेटींत राहूं देणें हें मूर्खपण होय. गहाण ठेवलेले दागिने आणि इनाम जमिनी ( मिळकती ) सावकाराच्या घरांत व्याज मुद्दला ऐवजीं गेलेल्याचीं हजारों उदाहरणें नेहमीं घडून येतात. तेव्हां अशा जिनसा गहाण ठेवण्याच्या भरीस न पडतां विकल्या तर आपल्या मालाची किंमत येऊन व्याजाचें दुटें आपल्या मागें लागण्याचें मुळींच भय रहात नाहीं. आपले लोक पैशाचा व्यय योग्य कामांत न करितां सोन्यारुप्यांत

अडकवून ठेवितात हें मागें सांगितलेंच आहे. आपल्या देशांतील बायकांना, त्यांचे प्राणाहून प्रिय असे दागिने विकून टाकणें बरें वाटणार नाहीं, करितां पुरुषांनीं त्यांची नीट समजूत घालून काय करणें तें करावें.

**४ आपल्या प्राप्तीचा योग्य खर्च करावा**—प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांतून राष्ट्रीय जमाखर्चाचे ताळेबंद व पुढील सालाच्या खर्चाचीं अंदाजपत्रकें तयार होत असतात. ही पद्धत मोठी फायदेशीर आहे.

या पद्धतीचा उपयोग कुटुंबांतील जमाखर्चाच्या बाबतींत केला असतां पुष्कळ फायदेशीर होईल. प्रत्येक कुटुंबांतील मुख्यानें गतसालाच्या जमाखर्चाचें एक पत्रक तयार करून पुढील सालाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार करावें. तें खालीं दर्शविलेल्या रीतीप्रमाणें करावें.

धर्मादाय, शिक्षण, प्रपंचखर्च, सरकारी कर, लत्तेकपडे वगैरेंचीं निरनिराळीं सदरें करून मागील सालीं कोणत्या खात्यांत आपल्या हातून जास्त खर्च झाला, या सालीं कोणत्या तुटी भरून काढावयाच्या आहेत हें नीट लक्षांत आणून त्या अनुरोधानें पुढील सालचें अंदाजपत्रक तयार करून तें अमलांत आणावें. अशा रीतीनें वागल्यास खर्च मर्यादित होऊन, कर्ज असल्यास फिटेल व निश्चयें कांहीं तरी शिल्लक राहील.

**५ आपल्या खर्चाचा हिशोब ठेवावा**—प्रत्येक मनुष्यास प्राप्तीच्या आंत खर्च करण्यास लावणारें,

जमाखर्चा सारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. या योगानें आपल्या एकंदर कामधंद्याच्या स्वरूपाचें चित्र नेहमीं आपल्या पुढें असतें. प्रत्येक दिवसाचा पैन पै खर्च टिपून ठेवावा. पुष्कळ गरीबलोकांना वाटतें कीं, आपल्याजवळ काय आहे? आणि ह्मणून व्यर्थ खर्चाचें टिपण ठेवण्याचे भानगडींत काय ह्मणून पडावें; परंतु ही त्याची चूक आहे. जों जों मनुष्य जास्त गरीब तों तों त्याला हिशोब ठेवणें अधीक अवश्य आहे. श्रीमंत लोकांना कमजास्त पैसा खर्च झाल्याचें मोठेंसें महत्व नसतें. परंतु गरीबांची कवडीन कवडी अधिक महत्वाची आहे, हें त्यांनीं पक्कें लक्षांत बाळगून त्या प्रमाणें आपलें वर्तन ठेवावें. आपल्यांत ह्मण आहे कीं, "कवडी पासून जोडावें आणि लाखा पासून मोडावें."

**६ रोख पैसे देऊन माल विकत घ्यावा**—"उधाऱ्याचें पोतें आणि सव्वा हात रितें" अशी एक ह्मण आहे. या ह्मणीचा अर्थ सूज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. जेव्हां रोख पैसा देऊन एखादा जिन्नस विकत घेण्याचा आपणास प्रसंग येतो, तेव्हां जरुरीच्या जिनसा मात्र विकत घेतों; आणि जेथें त्या स्वस्त व टिकाऊ मिळतील तेथेंच घेतों. या पासून आपला केवढा फायदा आहे बरें? उधार माल घेतल्या पासून आपलें फार नुकसान आहे. एक तर जिन्नस महाग मिळतो, शिवाय वायफळ व दिखाऊ वस्तु घेण्याची संवय लागते. आणि "वाणी देई व प्राणी घेई" अशी स्थिति होते.

आपण रोख पैसे देऊन माल घेतला तर, स्वस्त, उत्तम आणि फायदेशीर असा पडतो.

**७ हरासाच्या ठिकाणीं जाऊं नये**– मोठमोठ्या शहरीं लिलांवानें सामान विकण्याचीं दुकानें असतात. तेथें नानाप्रकारच्या चमत्कारिक व किंमतवान वस्तु थोडक्या किमतीस मिळतात ह्मणून लोक तेथें जातात. अशा ठिकाणीं गेल्यानें ज्या वस्तूंची आपल्यास जरुरी नाहीं अशा वस्तु सुरेख आणि कमी किमतीस मिळतात यामुळें आपणास घेण्याचा मोह पडतो; तेव्हां अशा जागीं जाण्याचें टाळावें हेंच चांगलें. जर आपण कदाचित् गेलोंच तर ज्या वस्तु वांचून आपलें अडणारें असतें अशा मात्र विकत घ्याव्या.

**८ पैसे व्यसनांत घालवूं नका**– जों पर्यंत मनुष्याच्या मागें उद्योग धंदा असतो व इतर गोष्टीकडे लक्ष पुरविण्यास त्याला वेळ नसतो, तोंपर्यंत तो व्यसनाधीन होत नाहीं असा साधारण नियम आहे. मन रिकामें असलें ह्मणजे नानातऱ्हेचीं व्यसनें व फंद त्याला सुचतात. या सुधारणेचा एकोणविसाव्या शतकांत निरनिराळ्या प्राणघातक व दारिद्री बनविणाऱ्या व्यसनांचा देशांत जितका प्रसार झाला आहे, तितका कोणत्याही कालीं झाला नसेल. आह्मीं आपल्या राजकर्त्यांचें चांगल्या गोष्टींत अनुकरण करण्या ऐवजीं मद्यपाना सारख्या भयंकर व्यसनाचें मात्र अनुकरण करीत आहों. विशेषतः सुशिक्षित ह्मणविणारे लोक या गोष्टींत पुढारी झाले हें अत्यंत लज्जास्पद व शो-

चनीय होय. निर्व्यसनी राहण्याचा आपल्या वाडवडिलांचा आपण अवश्य कित्ता घ्यावा. विड्या ओढणें हें तर आजकाल बाळकडूंच झालें आहे. तंबाकू खाणें संभावितपणा समजलें जातें. दारूपिणें तर काय सुधारलेलें व्यसन ! अशा तऱ्हेच्या व्यसनांपायीं शेंकडों लोक आजपर्यंत कर्जबाजारी होऊन कंगाल बनले आहेत. तेव्हां कसल्याही प्रकारच्या व्यसनांत पडून पैशाचा, अन्नूचा, आणि शक्तीचा नाश करून घेणें अतिशय वाईट आहे.

९ **'नाहीं' ह्मणावयास शिका**— जर तुमच्या खिशांत पैसे नाहींत आणि एखादी वस्तु तुम्हांस घ्यावीशी वाटली तर नाहीं असेंच ह्मणा. विश्वयोपितांच्या घरीं येण्याबद्दल जर तुह्मांस कोणी आग्रह केला तर 'नाहीं' असें बेलाशक ह्मणा. तुह्मांस तुमच्या शक्ती बाहेर पैसा खर्चून, दागदागिने अगर कपडेलत्ते घेण्याबद्दल, मुलांबाळांनीं अगर बायकोनें आग्रह केला तर साफ 'नाहीं' ह्मणा. गाणीबजावणी, आतषबाजी वगैरे भपकेदार समारंभांत पैसे उडविण्याची जेव्हां तुह्मांस भुरळ पडेल, व आपमतलबी मित्रमंडळीकडून आग्रह करण्यांत येईल तेव्हां 'नाहीं' याच द्व्याक्षरी मंत्राचा जप करा. सर्व तऱ्हेच्या वाईट संवयी पासून दूर रहाण्यास 'नकारा' सारखें दुसरें रामबाण औषध नाहीं. अशा तऱ्हेनें एकदां 'नाहीं' ह्मणण्याची संवय लागली ह्मणजे आयुष्याचे दिवस सुखांत जातील हें सांगण्यासच नको;

आणि असें झाल्यानें कर्जासारख्या काळजाला जाळणाऱ्या दुर्धर रोगापासून मनुष्य मुक्त होतो.

१० **उद्योगी व्हा**— " उद्योग्याचे घरीं ऋद्धी सिद्धी पाणी भरी." तूर्त आमच्या देशांत, उद्योगा सारख्या दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची जास्त अवश्यकता नाहीं. आपल्याला दारिद्र आलें, कर्जानें पिडिलें, ह्मणून राजकर्त्यांना विनाकारण शिव्या देत बसणें, अगदीं मूर्खपणाचें काम आहे. राजकर्त्यांसारखें आपण उद्योगी व साहसी झालें पाहिजे. आपल्यांतील श्रीमंत लोक, इनामदार वगैरे लक्ष्मीपुत्र, आळसांत आयुष्य खर्च करितात; तसें त्यांनीं न करितां जर उद्योगांत आपलें द्रव्य खर्च केलें तर त्यांचा आणि देशाचा किती तरी फायदा होणार आहे. हीच गोष्ट सुशिक्षित आणि सर्व साधारण लोकांसही लागू आहे. आळसानें आपणास गांजून सोडलें आहे. उच्च जातींतील लोकांना कष्टसाध्य कामें करण्याची लाज वाटून ते घोकंपट्टीच्या मागें लागले आहेत. ही स्थिति देशाच्या सांपतिकपणास सर्वथैव हानिकारक आहे. करितां सर्वांनीं उद्योगी व्हावें. ह्मणजे दारिद्य आणि कर्ज हें उभयतां शत्रू हद्दपार झालेच ह्मणून समजा.

११ **आपल्या प्राप्ती पैकीं काहीं रकम मागें टाका**— आमच्या लोकांस व सुशिक्षित रोजगारी लोकांस, प्राप्तींतील कांहीं रकम शिलक टाकण्याची मुळींच संवय नाहीं, त्यामुळें घरांत जर एखादें लग्नकार्य किंवा तशाच प्रकारचें अनुभूत कार्य निघालें तर

त्यांना कर्ज काढण्याखेरीज दुसरा उपाय रहात नाहीं; आणि हेच गृहस्थ जर दुर्दैवानें मृत्यु पावले तर त्यांच्या बायकांना " पोळपाट लाटण्याचीच मैत्री करावी लागते. " अशा शोचनीय स्थितींतील बरींच माणसें नेहमीं आपल्या पहाण्यांत येतात. या करितां लोकांनीं आपल्या प्राप्तीपैकीं रक्कम "पोष्टल सेव्हिंग बँक" मध्यें अगर दुसऱ्या एखाद्या सुरक्षित पेढीवर ठेवावी, ह्मणजे अशा रकमांचें व्याज येऊन लोकांचें कर्ज न काढतां वेळेवर उपयोग होतो. मरण हें अनिश्चित आहे. तें केव्हां येईल याचा नियम नाहीं. करितां आपल्या आयुष्याचा विमा उतरला, ह्मणजे आपल्या मागें आपल्या कुटुंबाला वाईट स्थिति येत नाहीं.

---

# कर्जमुक्त असल्यापासून फायदे.

पैशाच्या चांगल्या वाईट उपयोगाबद्दल विवरण केलें. आतां कर्जमुक्त असल्यापासून व थोडें भांडवल असल्यापासून काय फायदे आहेत याचें खालीं दिग्दर्शन करून हा लेख आटोपता घेतों.

१ लोकांनीं दिवसभर कष्टकरून मिळविलेला पैसा सावकाराच्या घरांत कसा जातो हें मागें दाखविलेंच आहे. ज्या मनुष्याला कर्ज नसतें, तो या सर्व त्रासापासून मुक्त असतो, व त्याचे पैसे शिल्लक राहतात.

२ आपल्यामध्यें ह्मण आहे कीं, काळजी सारखा दुसरा भयंकर रोग नाहीं. पैशाच्या आणि कर्जाच्या

फिकिरीमुळें मनुष्याला झोंप येत नाहीं, आणि अतिशय काळजीच्या प्रकृतीवर भयंकर परिणाम होतो. ज्याला कर्ज नसतें त्याला काळजी नसते व त्याची प्रकृती चांगली राहते.

३ ज्याला कर्ज असतें त्याला सावकारापासून फार त्रास सोसावा लागतो, मानहानी होते, व चारचौघांत खालीं पहाण्याचा प्रसंग येतो. परंतु कर्जमुक्त गृहस्थाला लोकांत मान मिळतो व त्याचीच चहा होते.

४ कर्जबाजारी मनुष्याला कर्ज देण्याचें सामर्थ्य नसल्या कारणानें खोटीं वचनें द्यावीं लागतात. लबाड्या करणें भाग पडतें. खोटें बोलणें व खोटीं कामें करणें, याला तो आपल्या कृतीनें उत्तेजन देतो. ऋणमुक्त मनुष्यास अशा गोष्टी करण्याचा मुळींच प्रसंग येत नाहीं.

५ दुसऱ्यावर उपकार करणें, एखाद्यास संकटीं साह्य करणें, इत्यादि सत्कृत्यें केल्यापासून जो मनाला आनंद होतो, त्या सारखा महदानंद दुसऱ्या कशांतही नाहीं. जी वस्तु आपली नाहीं ती धर्म करण्याला आपला अधिकार पोंचत नाहीं. आपल्याला उदार होण्या पूर्वी न्यायी झाले पाहिजे. ज्याला कर्ज नसतें त्याला व्याज वगैरे कांहीं द्यावें लागत नाहीं; आणि त्यामुळें पुष्कळ लोकोपयोगीं कृत्यांत त्याला मदत करितां येते. हा एक कर्जमुक्त असल्यापासून फायदा आहे.

६ कर्जबाजारी मनुष्याच्या कुटुंबाला कोणकोण-

त्या प्रकारचे हाल व वनवास सोसावे लागतात; याचें वर्णन मागील स्थलीं दिलेंच आहे. अशा गृहस्थाच्या घरीं सुख ह्मणून कसलें तें नसतें. उधळ्या मनुष्याचीं मुलेंही उधळीं निघतात. जो मनुष्य पैशाच्या कामांत दूरदृष्टी असतो त्याला त्याच्या हयांत सुख तर मिळतेंच परंतु त्याच्या पुढील संततीस देखील तें मिळतें.

## "डा. साम्युएल जान्सनचे कर्जा-विषयींचे विचार."

कर्ज ह्मणजे एक क्षुल्लक गोष्ट आहे असें तूं समजूं नको. कारण पुढें तुला तें भयंकर संकट आहे असें आढळून येईल. दारिद्र्याच्या योगानें लोकांचें कल्याण करण्याचीं पुष्कळ साधनें नाहींतशीं होतात; त्यायोगानें पापमूलक गोष्टी टाळण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं रहात नाहीं. ह्मणून कोणत्याही मनुष्याचें कर्ज न करण्याबद्दल तुह्मी प्रथमतः सावध असा. दारिद्र्याचा आपल्या घरांत कधींही शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं असा पक्का निश्चय करा. तुमच्या जवळ कितीही पैसा असो, नियमीत खर्च ठेवा. मानवी प्राण्यांच्या सुखाला दारिद्र्यासारखा दुसरा शत्रू नाहीं. त्याच्या योगानें स्वातंत्र्य नष्ट होतें; आणि सदाचरणानें वागणें फार कठीण पडतें. वागण्यांत नेमस्तपणा असणें हा शांततेचा पाया आहे. एवढेंच नव्हे तर परोपकाराचाही आहे. ज्याला स्वतःकरितां दुसऱ्याच्या मदतीची जरूरी असते तो दुसऱ्याला काय मद-

त करणार ! हे उघडच आहे. पैसा खर्च करण्याच्या पूर्वीं आपल्या जवळ तो पुरेसा असावयास पाहिजे. कर्ज आपला मान कमी करतें, त्याला त्याचे चाकर व्यापारीलोक व घरचीं माणसें देखील जसें वागवितील तसें वागणें भाग पडतें. तो स्वतःचा मालक मळींच रहात नाहीं; आणि जगांत त्याला निर्भयपणें असें कांहींच करितां येत नाहीं. ज्याला सत्य स्मरून वागणें अति कठीण जातें. आपल्या प्राप्तिनुरूप खर्च करणें हेंच प्रामाणिकपणाचें तत्व आहे. कारण मनुष्याला प्रामाणिकपणानें आपल्या ऐपतीनुरूप जर रहातां येत नाहीं, तर तो अप्रामाणिकपणानें दुसऱ्याच्या जिवावर खरोखरीच मजा मारीत असला पाहिजे."

**जानसनसाहेब ह्मणतात**— संपत्तिमान आणि सुखी होण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे काटकसर हा होय. ते काटकसरीला "शहाणपणाची मुलगी, सुव्यवस्थेनें वागणाऱ्याची बहीण व स्वतंत्रतेची आई असें ह्मणतात."

---

# अति महत्वाचें ऋण.

स्वदेशबंधू हो ! मनुष्याला या संसारयात्रेस जातांना होणाऱ्या कर्जरूपी अडचणयाचें वर्णन व त्यापासून मुक्त होण्यास उपाय, याविषयींचे जे विचार माझ्या अल्पमतीस बरेसे वाटले ते आपल्या पुढें ठेविले. परंतु कांहीं महत्वाचीं कर्जें आपल्या शिरावर आहेत कीं

र्जो फेडणें प्रत्येक मानवी प्राण्याचें कर्तव्य आहे; अशाविषयीं आतां दोन शब्द लिहून आपली रजा घेतों.

आपल्या देशाच्या धर्मरिवाजाप्रमाणें आपल्या शिरावर पुष्कळ ऋणें आहेत. आपण जन्मास आल्याबरोबरच आपल्या पाठीमागें पुष्कळशीं ऋणें लागतात. ज्या आईबापांनीं आपणांस जन्म दिला, या त्यांनीं आपणाकुळास दिलेल्या पवित्र कर्जाची योग्य फेड केली पाहिजे; व करणें हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे. दिलेलें कर्ज चक्रवाढव्याजानें जरी या सावकारांच्या घरीं गेलें तरी अनाठाईं जाणार नाहीं. ज्या देशांत आपण जन्मास येतों त्या देशाच्या अभ्युदयार्थ झटणें आपलें कर्तव्यच आहे. आपली देशभाषा, देशीधर्म, व्यापार आणि कलाकौशल्याच्या गोष्टी वगैरे सर्वांना उत्तम दशेप्रत आणून देशाला ऊर्जितावस्थेप्रत आणण्यास जर आपण कारणीभूत झालों नाहीं, तर देशाच्या कर्जांत राहिल्याचें पाप आपल्या मस्तकीं बसेल; इतकें होऊनहीं ज्याप्रमाणें व्यवहारांत आपणास कर्ज झालें असतां त्याचा परिणाम सर्व कुटुंबाला किंबहुना पुढील संततीस देखील भोगावा लागतो; त्याप्रमाणें हें कर्ज न फेडलें तर त्याहूनही भयंकर परिणाम होतो. देशांतील लोक जर अभिमानी नसतें तर तो देश त्यांच्या पेक्षां शूर आणि साहसी लोकांच्या भक्षस्थानीं पडून, त्यांतील सर्व लोक स्वातंत्र्या सार-

अजब देणगीस मुकतात. त्यांच्या भाषेचा कैवा-
कोणी रहात नाहीं. त्यांच्यांतील उत्तमोत्तम गु-
ण व कलाकौशल्यांस कोणी कवडीच्या मोलानेंही
ारीत नाहीं.

या स्थितीची सत्यता पहाण्यास ढळढळीत आप-
ले उदाहरण आपलेपुढें आहे. आपल्याला जी शो-
नीय स्थिति प्राप्त झाली आहे, ती हें देशाचें ऋण
फेडलें नाहीं याचें फळ आहे. जसा सावकार कर्जबाजारी
ठांस कर्ज न फेडल्याबद्दल दावा आणून न्यायाधि-
का ... त्याला शिक्षा देववितो; तसेंच जणूं काय ज-
न्नियत्या परमेश्वरानें, आम्हीं आपल्या जन्मभूचें,
...चें आणि आईबापांचें कर्ज न फेडल्याबद्दल ह-
ल्या सारख्या शोचनीय स्थितिरूपीं शिक्षा आम्हां-
...देली आहे व देईल. करितां वेळेवर सावध हो-
र आपणास मिळत असलेल्या उंच शिक्षणाचा उ-
...ग, घरांतील तंट्यांत व आपसांत यादवी माजवि-
ंत न करितां स्वदेशसेवेंत, आपल्या मातापितरां-
चा सेवेंत, आपल्या धर्मास व एकंदर स्थितीस उ-
...ावस्था आणण्याकडे खर्च करावा; ह्मणजे सच्चिदा-
...रमेश्वर आपल्या श्रमाबद्दल आपल्यास योग्य
...ला देईल.

...र लिहिलेले बरे वाईट दोन शब्द आपल्या हृद-
...ावर वागवून जर त्या प्रमाणें तुह्मीं व्यवहारांत

आपलें वर्तन ठेवलेंत ह्मणजे ग्रंथकर्त्याच्या श्रमाचें-
सार्थक झालें असें तो निश्चयें समजेल.

शेवटीं ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें हातीं घर
हें स्वदेशबंधुभगिनींच्या सेवेचें काम निर्विघ्नपणें त
स गेलें, त्यास अनन्यभावें शरण जाऊन व वारं
असेच स्वदेशसेवा करण्याचे सुप्रसंग येवोत अ
सविनय प्रार्थना करून आपला निरोप घेतों.

समाप्त.